पुढारी

महत्त्वाचे

# हॉटेल चालकांनो; कॉपीराईटच्या धमकीला घाबरू नका!

**मुंबई :** कॉपी राईटची भीती दाखवून हॉटेल व्यवसायिकांना बोगस कंपन्यांनी लुटल्याचा प्रकार उघड झाल्यानंतर हॉटेल व्यवसायिकांच्या हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडियाने जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. हॉटेल व्यवसायिकांना लुबाडणाऱ्या कंपन्यांविरोधात सावध करताना ज्यांची फसवणूक झालेली आहे, त्यांनी संघटनेकडे तक्रार नोंदवण्याचे आवाहन एचआरएडब्ल्यूआयने केले आहे. संघटनेचे अध्यक्ष शेरी भाटिया म्हणाले की, पुण्यात घडलेल्या घटनेची दखल घेऊन संघटनेने हि मोहीम सुरू केली आहे. या घटनेत मुंबईतील दोन खाजगी कंपन्यांनी स्टार हॉटेल्समधील लग्न समारंभात संगीत वाजवण्यासाठी कॉपी राइट परवाना देण्याच्या बहाण्याने व्यावसायिकांकडून तब्बल १ लाख ३७ हजार रुपये उकळले होते. या मोहिमेअंतर्गत असोसिएशन राज्यातील सर्व पोलीस आयुक्तांची बैठक घेऊन त्यांना एजन्सींच्या सुरू असलेल्या अवैध कामांची माहिती देणार आहे. संघटनेने सदस्य असलेल्या हॉटेल व्यवसायिकांना कॉपीराईट कायद्याबद्दल माहिती देण्याचा उपक्रमही या मोहिमेत राबवण्याचा निर्धार केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.